**<u>निशाणी क्र. ९ वर आदेश</u>**

**(दिनांक ३०/०१/२०२४)**

**०१.** यातील अर्जदार यांनी प्रस्तुतचा मुळ अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५(३) नुसार दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे अंतरिम पोटगी मिळण्याची विनंती देखील अर्जदारने केलेली आहे.

**०२.** अर्जदारने असे कथन केले आहे की, गैरअर्जदार हा अर्जदाराचा मुलगा आहे. गैरअर्जदार हा सांझी रेस्टॉरेन्ट या नावाचे हॉटेल चालवीतो. अर्जदार व गैरअर्जदार हे मौजा पवनगाव येथील शेतीचे मालक आहेत. गैरअर्जदारांनी खोटे हक्कसोड पत्र तयार करून अर्जदारची फसवणूक केली आहे. अर्जदाराचे पती हे हॉटेल तसेच दुध व्यवसाय करीत होते. सन १९६८ मध्ये अर्जदाराचे पती नंदलाल यादव हे मयत झाल्यानंतर तो व्यवसाय गैरअर्जदार हा चालवीत आहे. गैरअर्जदार हा शेती करून वार्षीक १,००,०००/– रुपये इतके कमवीतो. अर्जदार ही वयोवृध्द असून ती बाहेर काम करू शकत नाही. तसेच अर्जदाराचा सांभाळ करण्याची गैरअर्जदाराची नैतीक व कायदेशीर जबाबदारी आहे. तसेच गैरअर्जदार हा अर्जदार यांची कोणतीही व कसल्याही प्रकारची काळजी घेत नाही. अर्जदार यांच्या पालन पोषणासाठी गैरअर्जदार यांनी कोणतीही तरतुद केलेली नाही. अर्जदार हे सध्या हलाकीचे जिवन जगत आहेत. अर्जदार हिचे वय सध्या ८५ वर्षे आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी फौ.प्र.स. कलम १२५ नुसार गैरअर्जदार यांच्याकडून उदरनिर्वाहाकरीता अंतरिम पोटगी रक्कम रुपये १०,०००/– ची मागणी केलेली आहे.

**०३.** गैरअर्जदार यांनी नि.क्र. ०८ खाली त्याचे म्हणणे दाखल केलेले आहे व अर्जातील सर्व कथने नाकारली आहे. अर्जदार सोबतचे नाते गैरअर्जदार यांनी कबुल केले

आहे. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी त्यांच्या मुलीला मिळकतीमध्ये हिस्सा मिळावा म्हणून खोटेपणाने दाखल केलेला आहे. गैरअर्जदाराची बहिण व अर्जदारची मुलगी लिलाबाई यादव हिने गैरअर्जदाराविरुध्द नि.दि.दा.क्र. १९/२०२२ हा मिळकतीमधील हिस्सा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार व लिलाबाई यादव यांनी संगणमत करून प्रस्तुतचे खोटे प्रकरण गैरअर्जदाराविरुध्द दाखल केले आहे. अर्जदार ही गैरअर्जदारसोबत राहत होती परंतु अर्जदार हिने अचानक लिलाबाई यादव हिच्यासोबत राहणे सुरु केले. गैरअर्जदार हा अर्जदारचा सांभाळ करण्यास तयार आहे. परंतु गैरअर्जदारने अर्जदार सोबत राहणे आवश्यक आहे. गैरअर्जदारने त्याचा हॉटेल व्यवसाय असल्याचे कबुल केले आहे. परंतु तो सध्या बंद स्थितीत असून त्यातून कोणतेही उत्पन्न मिळत नसल्याचे कथन गैरअर्जदाराने केले आहे. गैरअर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०४.** अर्जदार व गैरअर्जदार तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. गैरअर्जदार यांनी कबुल केल्याप्रमाणे अर्जदार ही त्यांची आई आहे. तसेच अर्जदार हिचे वय ८५ वर्षे इतके असल्याचे दिसून येते. सध्या अर्जदार ही तिच्या मुलीकडे राहत आहे. अर्जदार या गैरअर्जदार याच्या आई असल्यामुळे त्याचा सांभाळ करण्याची नैतीक व कायदेशीर जबाबदारी ही गैरअर्जदार यांची आहे. अर्जदार याचे वय व अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील नाते लक्षात घेता, अर्जदार या गैरअर्जदार कडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत.

**०५.** अर्जदारानी गैरअर्जदार कडून रक्कम रुपये १०,०००/- अंतरिम पोटगी म्हणून मागणी केली आहे. अर्जदारांच्या कथनानुसार गैरअर्जदार यांचा हॉटेल व्यवसाय आहे व त्यांना शेतीतून देखील उत्पन्न मिळते. गैरअर्जदारने हॉटेल व्यवसाय असल्याचे मान्य करून सध्या त्यातून उत्पन्न मिळत नसल्याचे कथन केले आहे. परंतु सदरची बाब ही पटण्यासारखी नाही. तसेच गैरअर्जदारने त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्जदार ही गैरअर्जदारासोबत राहण्यास तयार

असल्यास गैरअर्जदार हे तिचा साभांळ करण्यास तयार असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांची आर्थीक स्थिती चांगली असल्याचे दिसून येते. अश्या परिस्थितीत सद्यः स्थितीच्या महागाईच्या दराचा विचार करता अर्जदार यांना गैरअर्जदार कडून रक्कम रुपये ४,०००/– प्रति महिना अंतरीम पोटगी मंजूर करणे योग्य होईल. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

**आ दे श**

१. गैरअर्जदार यास असे आदेशित करण्यात येते की त्यांनी अर्जदाराला अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रुपये ४,०००/– (फक्त चार हजार रुपये) अर्ज दाखल केल्यापासुन ते मूळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत अदा करावेत.

(*आदेश खुल्या न्यायालयात जाहिर*)

**स्वाक्षरी/–**

**(सागर एस. जाधव)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. २, कामठी.

ठिकाण –कामठी

दिनांक –३०/०१/२०२४